महाराष्ट्र शासन
# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार
दूरध्वनी क्र. ०२५६४-२९५७७२ जिल्हा क्रीडा संकुल जवळ, खामगाव रोड, नंदुरबार-१२
Email ID : dietnandurbar@maa.ac.in

जा.क्र./जिशिप्रसं/नं/शिक्षक स्पर्धा/२०२५-२६/६९६९ दिनांक: ३०/१०/२०२५

प्रति,
१. मा.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
२. शिक्षणाधिकारी प्राथमिक जि प (सर्व)
३. शिक्षणाधिकारी माध्यमिक जि प (सर्व)
४. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
५. प्रशासन अधिकारी नपा/म.न.पा. (सर्व)

**विषय: शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत...**

**संदर्भ:** १) राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०
२) राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४
३) शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र. क्र.१०/एसडी-६ मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च २०२४ (SQAAF)
४) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र जा. क्र. राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/२०२५-२६, दिनांक १०/१०/२०२५
५) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या Online बैठकीमधील सूचना

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण 42 विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन 2025-26 या वर्षापासून एकूण 42 स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व डायटकडून करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित डायटकडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

वरील 42 स्पर्धांपैकी **विज्ञान व गणिताचा जादूगार** या स्पर्धेच्या राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

# विज्ञान व गणिताचा जादूगार स्पर्धा आयोजनाबाबत सर्वसाधारण सूचना

१. सदर स्पर्धा तालुका, विभाग व राज्य स्तर अशा तीन टप्प्यात आयोजित केली जाईल.
२. तालुकास्तरावर सर्व स्पर्धांचे आयोजन जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी करतील.
३. स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी जिल्हा/ राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख (केंद्र समन्वयक) यांना गूगल फॉर्मची लिंक देण्यात येईल.
४. केंद्रप्रमुख यांनी स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव लिंकवर नोंदवावे.
५. केंद्रातून एक शिक्षकाला स्पर्धेसाठी पाठविणे अपेक्षित आहे. एक पेक्षा अधिक शिक्षक स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुक असल्यास, केंद्र पातळीवर स्पर्धा राबवून शिक्षकाची निवड करावी. त्यासाठी मूल्यांकनाचा निकष म्हणून तालुका ते राज्य पातळी यासाठी निर्धारित केलेले निकष परीक्षणासाठी उपयोगात घेता येतील.
६. स्पर्धा निहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्याची/शिक्षकाची लेखी संमती घ्यावी. व स्पर्धे वेळी आयोजकांकडे सादर करावी.
७. तालुकास्तरावरील स्पर्धेतील एका विजेत्याची निवड विभाग स्तरावर सहभागासाठी होईल.
८. विभाग स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी संबधित उपसंचालक कार्यालयासह, प्राचार्य (**DIET**), शिक्षणाधिकारी (प्राथ.) शिक्षणाधिकारी (माध्य.) यांची राहील.
९. विभाग स्तरावर प्रथम पाच क्रमांकाच्या विजेत्यांची निवड राज्यस्तरावर सहभागासाठी होईल.
१०.राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन नंदुरबार जिल्हा करेल.
११. राज्यस्तरावर १० विजेत्या स्पर्धकांची निवड करण्यात यावी .
१२. विभाग स्तरावरील विजेत्या पाच स्पर्धकांची नावे संबंधित विभागाने राज्यस्तरीय स्पर्धा आयोजक नंदुरबार जिल्ह्याकडे ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी पाठवावेत.
१३. तालुका स्तरावरील स्पर्धा नोव्हेंबर २०२५ मधील दुसरा शुक्रवार व शनिवार रोजी आयोजित केल्या जातील.
१४. विभाग स्तरावरील स्पर्धा डिसेंबर २०२५ महिन्यातील दुसरा शुक्रवार व शनिवार (१२ व १३ डिसेंबर २०२५) रोजी आयोजित केल्या जातील.
१५. राज्यस्तरावरील अंतिम स्पर्धा जानेवारी २०२६ मधील दुसरा शुक्रवार व शनिवार (०९ व १० जानेवारी २०२६) रोजी आयोजित करण्यात येतील.
१६. सहभागी स्पर्धकांनी तालूकास्तरावर स्वखर्चाने उपस्थित रहावे.
१७. सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य ओळखून नामनिर्देशन करावे. दि. ३१ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.
१८. सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची व स्थळांची निवड करून परीक्षकांची यादी अंतिम करावी.
१९. स्पर्धेसाठी २ परीक्षकांची निवड करण्यात यावी. परीक्षक म्हणून सेवानिवृत्त शिक्षक, सीनियर कॉलेजचे प्राध्यापक, डी.एड., बी.एड. कॉलेज यात अध्यापकाचार्य असलेले, परिसरातील केंद्र, तालुका, राज्य इत्यादीमधील गणित, विज्ञान विषयात तज्ञ शिक्षक यांची निवड करावी.

## स्पर्धेचे नियम :

१. स्पर्धेचा आशय व निर्मिती विज्ञान व गणित विषयांसाठी असावा.
२. सादरकर्त्यास एकदा ठरविलेल्या विषयात तालुका स्तरापासून राज्यस्तरापर्यंत बदल करता येणार नाही.

३. सदर स्पर्धा सादरीकरण पद्धतीने होणार असून त्यासाठी आयोजकांनी आवश्यकतेनुसार नियोजन करावे.
४. स्पर्धेमध्ये सादरीकरण करणे बंधनकारक असून,सादरीकरणाची भाषा मराठी/हिंदी/इंग्रजी असावी. यांपैकी कोणत्याही एका भाषेतून स्पर्धकाला सादरीकरण करता येईल. मात्र विजेता सर्व भाषांमधून एकच निवडला जाईल.
५. सादर केल्या जाणाऱ्या प्रयोग किंवा कृतींमध्ये नावीन्यता असणे आवश्यक असून सादरीकरण साहित्य हे गणित व विज्ञान तत्त्वावर आधारित असणे आवश्यक आहे.
६. सादरीकरण कमीत कमी ५ ते ७ मिनिटात करणे आवश्यक आहे.
७. सदर सादरीकरण करत असताना कोणत्याही समुदायाच्या भावना दुखावणार नाहीत याची दक्षता सादरकर्त्यांने घेणे आवश्यक राहील.
८.अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे कोणतेही विधान अथवा मुद्दा नसावा.
९. सादरीकरणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकाने सोबत आणणे आवश्यक राहील.
१०. बाजारामध्ये उपलब्ध असणारे तयार साहित्य वापरता येणार नाही.
११. सादरीकरणातून विषयातील संकल्पना स्पष्ट करणे, कृतीमागील वैज्ञानिक तत्त्व स्पष्ट करणे आणि कार्यकारणभाव स्पष्ट करणे आवश्यक आहे.
१२. सादरीकरण झाल्यानंतर स्पर्धेच्या निकालाबाबत परीक्षकांचा व मुल्यमापन समितीचा निर्णय हा अंतिम असेल.
१३. स्पर्धेसाठी स्पर्धकाकडे मुख्याध्यापकांचे किंवा कार्यालय प्रमुखांचे संमतिपत्र असणे आवश्यक आहे.

## स्पर्धेचे मूल्यांकन

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांवरील परिणामकारकता | १५ |
| २ | प्रस्तुतीकरणाचा दर्जा | २० |
| ३ | प्रत्यक्ष उपयोगिता | १५ |
| ४ | सर्जन शीलता | १५ |
| ५ | नाविन्यता | १५ |
| ६ | संकल्पनेचे स्पष्टीकरण | २० |
| | एकूण गुण | १०० |

## स्पर्धेचा प्रकार –

### १) तालुकास्तर

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | वार व दिनांक |
|---|---|---|
| १. | विज्ञान व गणिताचा जादूगार स्पर्धा | नोव्हेंबर २०२५ (दुसरा शुक्रवार, दुसरा शनिवार) |

तालूकास्तरीय स्पर्धा आयोजन समिती संबधित तालूक्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी स्थापन करावी. सदर आयोजन समितीत विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख, विषयसाधन व्यक्ती तसेच तालूक्यातील जाणकार विज्ञान व गणिताचे मुख्याध्यापक किंवा किंवा शिक्षक यांचा समावेश असावा. सदर आयोजन समितीचे जेष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) हे सदस्य सचिव असतील.

**स्पर्धेचे संभाव्य नियोजन -**

| अ.क्र | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तालूकास्तर | विभागस्तर | राज्यस्तर |
| १. | दुसरा शुक्रवार, दुसरा शनिवार | विज्ञान व गणिताचा जादूगार स्पर्धा | नंदुरबार | नोव्हेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १ विजेता निवडणे.) | डिसेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील ५ विजेता निवडणे.) | जानेवारी अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १० विजेता निवडणे.) |

## विज्ञान व गणिताचा जादूगार तालुकास्तर स्पर्धा आयोजनाबाबत सूचना-

नोव्हेंबर महिन्याच्या दुसरा शुक्रवारी व शनिवार (१४/१५ नोव्हेंबर) रोजी प्रत्येक तालुकास्तरावर स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे. त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा / राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.
२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.
३. स्पर्धेत केंद्रातील एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.
४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची/ शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.
५. सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल. स्पर्धेत सहभागी अधिकाऱ्यांची नावे विभागस्तरीय स्पर्धेसाठी कळविण्यात येतील.
६. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.
७. दि. ३१/१०/ २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.
८. वैयक्तिक तालुकास्तरावरील स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.
९. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
१०. तालुकास्तरावर वरील स्पर्धाची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील गटशिक्षणाधिकारी यांनी तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.
११. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून DIET कडे बायोडाटासह दि. ३१/१०/ २०२५पर्यंत पाठवावी. तसेच स्पर्धेचे ठिकाण ही कळवावे.
१२. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी, विभागस्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी एससीईआरटी पुणे कडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे. प्रत्येक स्पर्धेसाठी दोन परीक्षकांची निवड

करण्यात यावी. परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

१३. तालुकास्तरीय स्पर्धा आयोजित करताना आयोजक केलेल्या ठिकाणी विज्ञान व गणिताचा जादूगार स्पर्धेसाठी आवश्यक फळा, टेबल व पीपीटी सादरीकरणासाठी प्रोजेक्टर ची व्यवस्था स्पर्धकांच्या पुरेशा संख्येत उपलब्ध करून देण्यात यावी. स्पर्धेसाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री व ठिकाण उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी गटशिक्षण अधिकाऱ्यांची असेल.

१४. तालुकास्तरीय स्पर्धेत ३० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाल्यास दोन गटात स्पर्धेचे मूल्यांकन करण्यात चहापान

१५. तालुकास्तरावर स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजेत्या स्पर्धकाचे नाव विभागास्तारावरील स्पर्धेकरिता पात्र म्हणून संबधित जिल्ह्याचे DIET प्राचार्य यांना विहित नमुन्यात कळवावे.

## तालुकास्तरीय स्पर्धा खर्चाचे अंदाजपत्रक (प्रति तालुका )

| स्तर | क्रमांक | खर्चाचा मुद्दा/बाब | अपेक्षित खर्च रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| तालुका | १ | मानधन | १०००/- | ३० स्पर्धकांसाठी २ परीक्षक नेमावेत. ३० पेक्षा अधिक स्पर्धक असल्यास २ गट करून परीक्षक दुप्पट नेमावेत. प्रत्येकी ५००/- इतके मानधन देय असेल. |
| | २ | चहापान | ५००/- | उपस्थित सर्वांना |
| | ३ | व्यवस्थापन खर्च | १०००/- | टेबल, प्रोजेक्टर इ. आवश्यक सुविधा उपलब्धतेसाठी आवश्यकतेनुसार |
| | **एकूण** | | **२५००/-** | |

**विभाग स्तरीय विज्ञान व गणिताचा जादूगार स्पर्धा आयोजनाबाबत सूचना-**

डिसेंबर महिन्याच्या दुसरा शुक्रवारी व शनिवार रोजी प्रत्येक विभागस्तरीय स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी राज्य यांचेकडून संबधित जिल्ह्याचे DIET प्राचार्य यांना लिंक देण्यात येईल.

२. तालुकास्तरीय स्पर्धेतील प्रथम क्रमांक आलेल्या स्पर्धकांची नावे प्राचार्य संबंधित डायट यांनी दिलेल्या लिंक वर नोंदवावी.

३. विभागस्तरीय विजेते स्पर्धकांना राज्य स्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे

४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची/ शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

५. सर्व स्पर्धांसाठी विभागस्तरीय सहभाग घेणाऱ्या शिक्षक यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल. स्पर्धेत सहभागी अधिकाऱ्यांची नावे विभागस्तरीय स्पर्धेसाठी घेतले जातील.

६. प्राचार्य संबंधित आयोजक डायट यांना लिंक पाठविली जाईल व विभागस्तरीय प्रथम पाच आलेल्या स्पर्धकांची लिंक स्वतः भरावी.

७. दि. २५/११/ २०२५ पर्यंत प्राचार्य संबंधित आयोजक डायट यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

९. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. कुठल्याही प्रकारचे भत्ते देय असणार नाही.

१०. विभागस्तरावर वरील स्पर्धाची जबाबदारी ही प्राचार्य संबंधित डायट यांची राहील. प्राचार्य संबंधित डायट यांनी विभाग स्तरीय समितीच्या मदतीने विभागस्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.

१२. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी, विभाग स्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी एससीईआरटी पुणे कडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे. प्रत्येक स्पर्धेसाठी दोन परीक्षकांची निवड करण्यात यावी. परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

१३. विभागस्तरीय स्पर्धा आयोजित करताना आयोजक केलेल्या ठिकाणी विज्ञान व गणिताचा जादूगार स्पर्धेसाठी आवश्यक फळा, टेबल व पीपीटी सादरीकरणासाठी प्रोजेक्टर ची व्यवस्था स्पर्धकांच्या पुरेशा संख्येत उपलब्ध करून देण्यात यावी. स्पर्धेसाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री व ठिकाण उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी संबंधित DIET प्राचार्य असेल.

१४. विभागस्तरीय स्पर्धेत 30 पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाल्यास दोन गटात स्पर्धेचे मूल्यांकन करण्यात येईल. त्या प्रमाणात परीक्षक वाढवून घेण्यात यावेत.

### विभागस्तरीय स्पर्धा खर्चाचे अंदाजपत्रक

| **स्तर** | **क्रमांक** | **खर्चाचा मुद्दा/ बाब** | **अपेक्षित खर्च रक्कम** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| विभाग | १ | मानधन | ४०००/- | ३० स्पर्धकांसाठी २ परीक्षक नेमावेत. ३० पेक्षा अधिक स्पर्धक असल्यास २ गट करून परीक्षक दुप्पट नेमावेत. प्रत्येकी ५००/- इतके मानधन देय असेल. |
| | २ | चहापान | १०००/- | उपस्थित सर्वांना |
| | ३ | व्यवस्थापन खर्च | ५०००/- | टेबल, प्रोजेक्टर इ. आवश्यक सुविधा उपलब्धतेसाठी |
| | | **एकूण** | **१००००/-** | |

### २) राज्यस्तर स्पर्धा-

राज्यस्तर स्पर्धा आयोजनासाठी जिल्हास्तरीय समिती नंदुरबार जिल्हा करेल. वरील नियोजनामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास SCERT / स्थानिक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यांचे मार्फत कळविण्यात येईल.

### राज्यस्तर स्पर्धा खर्चाचे अंदाजपत्रक

| **स्तर** | **क्रमांक** | **खर्चाचा मुद्दा/बाब** | **अपेक्षित खर्च रक्कम** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| राज्यस्तर | १ | मानधन परीक्षक | ४०००/- | प्रति परीक्षक १०००/- प्रमाणे जास्तीत जास्त ४ परीक्षकांकरिता |
| | २ | भोजन व अनुषांगिक | ४०००० /- | सहभागी व परीक्षक |
| | ३ | प्रोजेक्टर, टेबल, फळा | १०००० /- | स्पर्धेचे व्यवस्थापन हेतू आवश्यक बाबींचा विचार करून खर्च करणे साठी |
| | | **एकूण** | **५४०००/-** | |

स्पर्धेचे ठिकाण

१. तालुकास्तरीय स्पर्धा – संबधित गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत कळविण्यात येईल.

२. विभागस्तरीय स्पर्धा- संबधित विभागस्तरीय DIET यांचे मार्फत कळविण्यात येईल.

३. राज्यस्तरीय स्पर्धा- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार

(डॉ. रमेश चौधरी)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
नंदुरबार

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३) मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
४) मा. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)